# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः12.04.2024** **वारःशुक्रवार**

---

1. लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होणार; राज्यातल्या 11 मतदारसंघांचा समावेश
2. राज्यात पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यासाठीच्या निवडणूक प्रचाराला वेग
3. ईद उल फित्रचा सण राज्यात विविध ठिकाणी उत्साहात साजरा आणि
4. थोर समाजसुधारक महात्मा जोतिबा फुले यांना जयंतीनिमित्त राज्यभरातून अभिवादन

**अधिसूचना**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी होणार आहे. या टप्प्यात 10 राज्यांमधल्या 94 मतदार संघात मतदान होणार आहे. त्यात राज्यातल्या रायगड, बारामती, धाराशिव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या 11 लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या मतदारसंघात आजपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होईल. 19 एप्रिल हा उमेदवारी अर्ज भरण्याचा अखेरचा दिवस आहे; आणि 20 एप्रिलला अर्जांची छाननी होईल. 22 एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि 7 मे रोजी मतदान होणार आहे.

**प्रचार**

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराला आता चांगलाच वेग आला आहे.

नांदेड लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारासाठी केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांनी काल सभा घेतली. यावेळी त्यांनी विरोधकांवर टीकेची तोफ डागली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारनं देशात आणि देशाच्या सीमेवर सुरक्षितता आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठी ठोस उपाययोजना केल्या असं ते म्हणाले.

बहुजन समाज पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा मायावती यांनी काल नागपुरातील बेजनबाग मैदानावर जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी काँग्रेस आणि भाजपावर जोरदार हल्ला चढवला. बहुजन पक्षाच्या प्रत्येक उमेदवाराला जास्तीत जास्त मतांनी निवडून देण्याचं आवाहन मायावतींनी केलं. बसपाकडून 13 उमेदवार निवडणूक लढवणार आहेत. उत्तर मुंबईतल्या बोरिवली इथं केंद्रीय मंत्री आणि भाजपा नेते पियूष गोयल यांनी हमाल, बूट पॉलिश आणि डबे पोचवणाऱ्या सर्व संस्था, पदाधिकारी आणि सदस्यांशी संवाद साधला.

गडचिरोली चिमूर मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल आलापल्ली इथं जाहीर सभा घेतली. यावेळी त्यांनी काँग्रेसवर घणाघाती टीका केली त्याचबरोबर केंद्र सरकारने संपूर्ण देश आणि गडचिरोली जिल्ह्यातील नागरिकांसाठी राबवलेल्या विविध योजनांची माहितीही दिली.

आगामी निवडणुकीत सुधीर मुनगंटीवार यांना मतदान करून पंतप्रधान नरेंद्र मोदींचे हात बळकट होणार असल्याचं प्रतिपादन फडणवीस यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावतीच्या जाहीर सभेत बोलताना केलं. यवतमाळच्या वणी इथं चंद्रपूर आर्णी

मतदारसंघाचे उमेदवार राजेश बेले यांच्या प्रचारसभेत बोलताना वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी भाजपा आणि कॉंग्रेसवर जोरदार टीका केली. गडचिरोली-चिमूरचे उमेदवार हितेश मडावी यांच्या प्रचारासाठी देखील आंबेडकर यांनी काल सभा घेतली.

पुणे शहर आणि जिल्ह्यातील महायुतीच्या कार्यकर्त्यांचा संयुक्त मेळावा काल झाला. यामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, यांच्यासह महायुतीच्या घटक पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. पुण्याचे महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्यासह जिल्ह्यातील महायुतीच्या चारही उमेदवारांना निवडून देण्याचं आवाहन यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी केलं. तर सर्व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित चारही मतदारसंघात काम करा; असं अजित पवार यांनी सांगितलं.

महविकास आघाडीचे पुण्याचे उमेदवार रवींद्र धंगेकर, बारामतीच्या उमेदवार सुप्रिया सुळे आणि शिरूर मतदार संघाचे उमेदवार अमोल कोल्हे यांनी काल पुण्यात मार्केट यार्ड परिसरात पदयात्रा काढली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. माढा लोकसभा मतदार संघाचे इच्छुक उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार यांची पुण्यात भेट घेतली. खेडमधले भाजपाचे अतुल देशमुख यांनी काल शरद पवार गटात प्रवेश केला केल्याची घोषणा शरद पवार यांनी पुण्यात केली.

**<u>धुळे-राजीनामा</u>**

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने शोभा बच्छाव यांना धुळ्यातून उमेदवारी दिल्यानंतर उमेदवारीसाठी इच्छुक असलेल्या नेत्यांनी नाराजी व्यक्त करत पदांचा राजीनामा दिला आहे. काँग्रेसचे धुळ्याचे जिल्हाध्यक्ष शामकांत सनेर तसंच जिल्हा ग्रामीण काँग्रेसचे अध्यक्ष तुषार शेवाळे यांनीही काल राजीनामा देत असल्याचं जाहीर केलं.

**<u>मतदारसंख्या</u>**

आगामी लोकसभा निवडणुकीत राज्यातल्या 48 मतदारसंघात सुमारे सव्वा नऊ कोटी मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदार संख्येच्या बाबतीत राज्यात पुणे जिल्हा आघाडीवर आहे. राज्यात 8 एप्रिलपर्यंत 9 कोटी 24 लाख 91 हजार 806 मतदारांची नोंद झाली आहे. यामध्ये 4 कोटी 80 लाख 81 हजार 638 पुरुष मतदार तर 4 कोटी 44 लाख 4 हजार 551 महिला मतदार आणि 5 हजार 617 तृतीयपंथी मतदार आहेत. पुण्यात सर्वाधिक म्हणजे 82 लाख 82 हजार 363 मतदार आहेत. रत्नागिरी, नंदुरबार, गोंदिया आणि सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यात महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा जास्त आहे. अहमदनगर, सोलापूर,जळगाव, कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या पाच जिल्ह्यांमध्ये 30 लाखांहून अधिक मतदार आहेत. तर बुलढाणा, अमरावती, यवतमाळ, नांदेड, रायगड, मुंबईशहर, बीड, सातारा, सांगली आणि पालघर या 10 जिल्ह्यांमध्ये 20 लाखांहून अधिक मतदार आहेत.

**<u>गृहमतदान-गडचिरोली</u>**

राज्यात पाच टप्प्यात होणाऱ्या मतदानासाठी निवडणूक यंत्रणा तयारीला लागली आहे. एकही पात्र मतदार मतदानापासून वंचित राहू नये, यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं यावर्षी प्रथमच 85 वर्षांवरचे मतदार आणि 40 टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या मतदारांसाठी गृह मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात 8 ते 14 एप्रिल या कालावधीत गृह मतदानाची प्रक्रिया राबवली जात आहे. ऐकूया याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून......

**महाराष्ट्र, छत्तीसगड आणि तेलंगणा या तीन राज्यांच्या सीमेवरच्या सिरोंचा इथल्या दोन वयोवृद्ध मतदारांना गृहमतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निवडणूक विभागाचं पथक काल सिरोंचा इथं दाखल झालं. वयाची शंभरी गाठलेल्या एका मतदारसह 86 वर्षीय मतदाराचं गृहमतदान यावेळी पार पडलं. निवडणूक विभागाच्या पथकानं या वयोवृद्ध मतदारांना गृह मतदानाची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितल्यानंतर, घरातच स्थापन केलेल्या तात्पुरत्या मतदान कक्षात,**

**गोपनियता बाळगून दोघांचंही मत नोंदवलं गेलं. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघात आतापर्यंत 85 वर्षावरील 923 मतदार आणि 282 दिव्यांग अशा एकंदर 1205 मतदारांनी गृह मतदानाद्वारे आपल्या मतदानाचा हक्क बजावला आहे. संपूर्ण मतदारसंघातून 85 वर्षावरील 1037 आणि 40 टक्क्यांपेक्षा जास्त दिव्यांगत्व असलेल्या 338 अशा 1375 मतदारांचे गृह मतदानासाठीचे अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी संजय दैने यांनी मंजूर केले आहेत. आकाशवाणी बातम्यांसाठी गडचिरोलीहून जयंत निमगडे यांच्यासह माधवी कुलकर्णी पुणे.**

**ईद**

ईद ऊल फित्र अर्थात रमजान ईदचा सण काल राज्यात विविध अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. ठीकठिकाणी हजारो मुस्लिम समाज बांधवांनी सामूहिक नमाज अदा केली. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर विविध पक्षाच्या नेत्यांनी वेगवेगळ्या ठिकाणी प्रत्यक्ष उपस्थित राहून नागरिकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. नाशिक शहरातल्या ईदगाह मैदानात नमाज पठणाबरोबरच मतदान जनजागृती देखील करण्यात आली. पालघरमध्ये मुस्लिम बांधवांनी मोठा जुलूस काढला होता; यावेळी राममंदिराजवळ हिंदू बांधवांनी त्यांना पाण्याची आणि इतर साहित्याची व्यवस्था केली.

**फुलेजयंती**

थोर समाज सुधारक महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त काल राज्यात विविध ठिकाणी त्यांना अभिवादन करण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस यांनी महात्मा फुले यांना अभिवादन केलं. पुण्यातल्या भिडे वाड्यात समता भूमी इथं काल विविध पक्षाच्या नेत्यांनी तसंच अनेक नागरिकांनी महात्मा फुले यांना अभिवादन केलं. नाशिकमध्ये वाकडी बारव भागातून पंचवटीपर्यंत शोभा यात्रा काढण्यात आली; यात महात्मा फुले यांच्या जीवन कार्यावर आधारीत चित्ररथ सादर करण्यात आले होते. नाशिकरोड इथं एका सेवाभावी संस्थेच्या वतीने सलग 18 तास अभ्यास करून अनोख्या पध्दतीने महात्मा फुले यांना अभिवादन करण्यात आलं.

**पाऊस**

विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागात कालही अवकाळी पाऊस आणि गारपीट झाली. धाराशिव, बीड, तसंच परभणी जिल्ह्यात सोसाट्याच्या वाऱ्यासह पाऊस पडला. गंगाखेड तालुक्यातील इळेगाव इथंल्या एकाचा अंगावर वीज पडून मृत्यू झाल्याची माहिती स्थानिक प्रशासनानं दिली आहे.

**हवामान**

येत्या 24 तासात विदर्भ, मध्य महराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांसह पावसाची शक्यता आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी गारपीट होण्याची शक्यताही हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.